संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७९/२०२३

नि.क्रं. २५/सी

**<u>सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ शपथेवर कथन करतो की</u>-**

माझे नाव - विद्या विश्वनाथ पाटील

वय - ५५ वर्षे, व्यवसाय- गृहीणी

राहणार - क. तारळे, ता:राधानगरी , जि: कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -</u>**

**१.** दि.१९ मार्च २०२३ रोजी मी रात्री ९.०० वा.चे सुमारास दुकानात चालले होते. सदरील वेळी आमचे घराचे शेजारी असलेले शेताच्या कडेला आले असता मागून एका मोटार सायकलने मला धडक दिली. मी जोरात ओरडले. त्यावेळेस माझा थोरला मुलगा माझे जवळ आला. सदरील वेळी आरोपी देखील पडले. आरोपी क्र. १ हा मोटार सायकल चालवत होता. आरोपी क्र. १ पळून गेला. आरोपी क्र. २ मोटार सायकलवर मागे बसलेला होता. आरोपी क्र. २ ने ते दोघे यात्रेसाठी आल्याचे सांगितले व तो मोटार सायकलचा मालक असल्याचे सांगितले.

**२.** मला किरण दोशी यांचे दवाखान्यात कोल्हापूर येथे नेले. तेथे माझे उजव्या पायाच्या शिरा मोडल्याचे आणि उजवा हात मोडल्याचे सांगितले. डॉक्टरांनी मला ऑपरेशन करण्याविषयी सांगितले. त्यावेळेस आम्ही निवृत्ती किसन पाटील याला कळविले असता तो आम्हाला धमक्या देवू लागला. दि.२२ मार्च २०२३ रोजी माझे पायाचे ऑपरेशन केले आणि १० दिवसांनी हाताचे ऑपरेशन केले. मला वाचता येत नसल्यामुळे मला मोटर सायकलचा क्रमांक सांगता येणार नाही. साक्षीदाराने बोटाने दाखवून आरोपी क्र. १ ची मोटर सायकल चालक म्हणून ओळख पटवली आणि बोटाने

दाखवून आरोपी क्र. २ ची देखील ओळख पटवली. सदरील अपघात आरोपी क्र. १ च्या चुकीमुळे झाला.

**३.** मी दवाखान्यात असताना दि.२०/०३/२०२३ रोजी पोलीसांनी माझा जबाब घेतला. मी ऑपरेशन करुन घरी आले असता पुन्हा दोन वेळेस पोलीसांनी माझा जबाब घेतला आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ वकील श्री. व्ही. बी. पाटील यांचे मार्फत -</u>**

**४.** माझे शिक्षण झालेले नाही. मला सही करता येते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी रात्री ९.०० वा. पितांबरी आणायला चालले होते असे सांगितले होते. माझे दि.०९/०४/२०२३ चे जबाबात तसे का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. घटनास्थळ हे आमचे घरापासून पाच पावलावर आहे. सदरील वेळी मी संतोष शिवुडकर यांचे दुकानात चालले होते. दुर्गमानवड ते तारळेच्या उजव्या बाजूस दुकान आहे. मी डाव्या बाजूने चालले होते.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, सदरील दिवशी दुर्गमानवडची यात्रा होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरील दिवशी कसबा तारळेची देखील यात्रा होती. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेच्या वेळेस आंधार होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरील ठिकाणाचा रस्ता खराब आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गमानवडच्या यात्रेस २ ते ३ लाख भावीकांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस देखील गर्दी होती. शिवुडकर यांचे दुकान आमचे घरापासून १० मीनीटाचे अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दुकानापर्यंत पोहचले आणि डाव्या बाजूला वळत असताना ही घटना घडली.

**६.** मला दोन वर्षापासून चष्मा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस मला चष्मा नव्हता. आता मला दि.२०/०३/२०२३ रोजीच्या माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग-अ वाचून दाखविणेत आला. सदरील मजकूर माझे दि.०९/०४/२०२३ च्या जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. डॉक्टरांनी मला उजव्या हाताचे मनगठा जवळील हाड व उजव्या पायाच्या मांडीचे हाड घुडग्याजवळून फ्रक्चर झाले आहे हे दि.१९/०३/२०२३ रोजीच सांगितले. माझे पायाचे ऑपरेशन झाल्यानंतर तीन दिवसांनी मला डिस्चार्ज मिळाला. त्यानंतर पुन्हा हाताचे ऑपरेशन करुन दि.०२/०४/२०२३ रोजी मला डिस्चार्ज मिळाला. मला आता माझे दि.०९/०४/२०२३ मधील अधोरेखांकित भाग-ब वाचून दाखविला तो बरोबर आहे आता मला माझे दि.२०/०३/२०२३ चे जबाबातील अधोरेखांकित भाग-अ वाचून दाखविणेत आला. माझा आवाज ऐकूण मुलगा बाहेर आला हे खरे आहे. दि.२०/०३/२०२३ चे जबाबात असे खोटे का नमूद केले आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. मला धडक लागल्यावर मी रस्त्याच्या बाहेरील बाजूस पडले. घटनेनंतर ५ मीनीटांनी मला दवाखान्यासाठी घेवून गेले. माझा आवाज ऐकून मुले ५ मीनीटांत घटनास्थळी आली. हे म्हणणे खरे आहे की, सदरील वेळी गाडया आणि गर्दीचा गोंगाट होता.

**७.** मला घटनास्थळावरून दोशी हॉस्पीटलमध्ये जाण्याकरीता दीड तास लागला. या घटनेपुर्वी मी दोशी हॉस्पीटल मध्ये गेलेले नाही. घटनेपुर्वीपासून माझा डावा पाय थोडाफार दुखतो. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या पायाचे ऑपरेशन करायचे होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस मागून गाडी येत होती हे मला माहीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गाडी कोण चालवत होते हे मला माहीत नाही. घटनास्थळी आरोपींना त्यांचे नाव विचारले असता मला ते समजले. दि.०९/०४/२०२३ चे जबाबात मला उपचार सुरू असताना मुलगा विनोद याचेकडून मोटर सायकलवरील इसमांचे नाव समजल्याचे नमूद आहे. परंतु मला घटनास्थळीच आरोपींचे गाडीची किल्ली काढली,

नावाची विचारपूस केली तेव्हाच समजले.

८. घटनास्थळावरून कोल्हापूरला गाडीत मी, माझे दोन मुले आणि माझा भाऊ सदाशिव जोशी असे गेलो. मला घटनास्थळ असलेला रस्ता किती लांबी रुंदीचा आहे हे सांगता येणार नाही. मी गाडीत बसलेनंतर आरोपी क्र. १ घटनास्थळावरून पळून गेले. माझा दुसरा मुलगा शेखर हा पोलीस असून त्याचे परिवारासोबत कोल्हापूर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मुलगा विनोद हा माझे सोबत गावात राहतो. माझे मुलगा शेखरची पत्नी घरात उपस्थीत होती व घटनेनंतर ती पाणी घेवून बाहेर आली. माझे मुलगा शेखर याने आरोपी क्र. १ ला फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ने माझा मुलगा शेखर याला धमकी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आरोपी क्र. १ ला वैद्यकीय खर्च १,७५,०००/- ची मागणी करणेकरीता फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरील फोन हा घटनेच्या रात्रीच केलेला होता. सदरील फोन हा घटनेच्या दुस-या दिवशी केलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला धडक दिल्याचे दिसले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुर्वीपासूनचा आजाराचा खर्च करणेकरीता आणि आरोपीला लुबाडण्याच्या हेतूने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.२१/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.